**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **"मेगा बीच क्लीनअप ड्राईव्ह २०२५" चे भव्य आयोजन**

शनिवार दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय कोस्टल दिनाचे औचित्य साधून मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागाच्यावतीने "मेगा बीच क्लीनअप ड्राईव्ह २०२५" ही मोहिम आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत उत्तन समुद्र किनारा येथे सकाळी ७.०० ते १०.०० वाजेपर्यंत किनारा स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग (भारत सरकार) यांच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालिकेच्यावतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम म्हणजे एक सामाजिक बांधिलकीचा आणि स्वच्छतेचा खऱ्या अर्थाने जनजागर आहे.

या मोहिमेचा उद्दिष्ट केवळ समुद्र किनारा स्वच्छ करणे नव्हे, तर भविष्यासाठी एक शाश्वत, सुंदर आणि हरित संदेश देणे आहे. ही मोहिम आपल्या सागरी किनाऱ्याच्या जतनासाठी, पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रचार-प्रसार करण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. सेवाभावी संस्था, शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी, मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरिक, माजी पदाधिकारी, समाजसेवक तसेच पत्रकार बंधूनी यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन ही मोहिम यशस्वी करावी असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.